नि. फौ. ख. क्र.१८२/२०१६ निशाणी ५७

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – दिपककुमार नारायण शर्मा

वय – ६० वर्षे, व्यवसाय – व्यापार

पत्ता – पारस फाटा, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. माझी शेती भिकुंडखेड शिवारात सर्व्हे नं. ३ व ४ मध्ये अनुक्रमे २९ आर आणि ४६ आर अशी एकुण अंदाजे २ एकर शेती आहे. त्याठिकाणी आम्ही शाळेचे बांधकाम करुन श्रीदिक्षा इंग्लीश हायस्कुल या नावाने शाळा चालवतो. सदर शेती माझे मुले अभिजीत शर्मा आणि अभिनीत शर्मा यांचे नावाने आहे. मी आरोपींना ओळखतो. आरोपी आमच्या दुसऱ्या मांडोली येथील वडीलोपार्जीत शेतात मजुरी करण्यासाठी येत होते म्हणुन मी त्यांना त्यांच्या नावाने ओळखतो. आरोपी नेहमी आमच्या शाळेत येवुन शाळेची जागा आमची आहे असे सांगुन भांडण करित असतात.

२. दि. १५.०६.२०१६ रोजी शाळेमध्ये इलेक्ट्रीकचे फिटींगचे काम सुरु होते म्हणुन मी त्या ठिकाणी काम पाहण्यासाठी गेलो होतो. इलेक्ट्रीकचे फिटींगचे काम फिरोजखान नावाचा व्यक्ती करित होता. सकाळी ०९.३० वाजताच्या दरम्यान चारही आरोपी ट्रॅक्टर घेवुन शाळेच्या आवारात आले आणि त्यांनी ट्रॅक्टरने शाळेच्या शेतीवर नांगरणी सुरु केली. ज्यावेळी त्यांनी नांगरणी केली त्यावेळी सदर आवार रिकामा होता. मी त्यांच्याकडे धावत जावुन त्यांना नांगरणी करण्यापासुन मनाई केली. तेव्हा आरोपींनी मला लाथाबुक्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली आणि अश्लील शिवीगाळ केली. आरोपींनी मला जिवे मारण्याची धमकी दिली. मी त्यांना मनाई केली असता ते तेथुन निघुन गेले. मी त्यांना समजावुन सांगितले ही जागा आमची आहे, त्यावर तुम्ही नांगरणी करु नका. त्यानंतर माझी तब्येत बरी नसल्याने मी घरी जावुन माझ्या पत्नीला झालेली घटना सांगितली. दुसऱ्या दिवशी दुपारी पोलीस स्टेशनला जावुन मी आरोपींविरुध्द

रिपोर्ट दिला. आता मला रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच असुन, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ५८** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर दाखविण्यात आली. ती तीच असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो **नि.क्र. ५९** वर आहे. माझ्याकडे मी सदर शेत माझ्या मुलांच्या नावाने खरेदी केल्याचे खरेदीखत आणि ७/१२ उतारे असे दस्त आहेत. सदर खरेदीखत आणि ७/१२ उताऱ्यांच्या छायांकित प्रती अभिलेखावर दाखल आहे. त्या त्याच आहे, त्यांना अनुक्रमे **वस्तु नि. अ व ब** देण्यात येत आहे. सदरचे दस्त मी पुराव्याकामी न्यायालयात हजर करु शकतो. आरोपींची नावे दादाराव वानखडे, बंडु दादाराव वानखडे, गिताबाई इंगळे व वेणुताई पाचपोर अशी आहेत. त्यापैकी दादाराव आणि बंडु आज हजर आहेत.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एस.टी. इंगळे यांचे मार्फत</u>**

३. आरोपी क्र. ४ वेणुताई दशरथ पाचपोर हिने माझ्या व माझ्या पत्नी विरुध्द अकोला येथील न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सदर दावा वेणुताई पाचपोर यांनी मौजे कासारखेड, ता. बाळापुर येथील शेत सर्व्हे नं. २ क्षेत्र ४० आर आणि शेत सर्व्हे नं. १० क्षेत्र २० आर या ई–क्लास जमीन करिता दावा दाखल केला आहे. सदर जमीनीबाबत आमचे व वेणुताई पाचपोर यांचेत सन २०१२ पासुन वाद सुरु आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या वादातुन मी आरोपींविरुध्द रिपोर्ट दिला. पोलीसांनी रिपोर्ट मी सांगितल्याप्रमाणे लिहिला होता.

४. आरोपी माझ्या मांडोली येथील वडीलोपार्जीत शेतात मजुरीसाठी येत होते म्हणुन मी त्यांना त्यांच्या नावासह ओळखतो ही बाब मी पोलीसांना रिपोर्ट देतांना सांगितली नव्हती. साक्षीदार पुन्हा सांगतात की, सदर बाब मी पोलीसांना रिपोर्ट देतांना सांगितली होती. सदर बाब माझ्या रिपोर्ट मध्ये का नमुद नाही त्याचे कारण मला सांगता येणार नाही. दि. १५.०६.२०१६ रोजी शाळेमध्ये इलेक्ट्रीकचे फिटींगचे काम सुरु होते म्हणुन मी त्या ठिकाणी काम पाहण्यासाठी गेलो होतो, इलेक्ट्रीकचे फिटींगचे काम फिरोजखान नावाचा व्यक्ती करित होता असा मजकुर मी रिपोर्ट देतांना पोलीसांना सांगितला नाही.

प्रश्न – तुम्ही आजरोजी ही बाब पहिल्यांदा सांगत आहे ?
उत्तर – पोलीसांनी माझे बयान नोंदविले त्यावेळी सांगितले होते.

५. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना बयान देतांना सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. माझी तब्येत बरी नसल्याने मी घरी जावुन माझ्या पत्नीला झालेली घटना सांगितली ही बाब मी पोलीसांना रिपोर्ट देतांना सांगितली होती किंवा कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर बाब मला आठवत नसल्याचे मी खोटे सांगत आहे. असे माझे म्हणणे नाही की, शेत सर्व्हे नं. २ मधील ४० आर आणि शेत सर्व्हे नं. १० मधील २० आर ई–क्लास जमीन माझी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८२ पासुन सदर मिळकत वेणुताई वहिती करते. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या पत्नीने वेणुताईला सदर शेती वहिती करण्या पासुन अडथळा केला, म्हणुन वेणुताईने आमचे विरुध्द दावा दाखल केला. दिवाणी न्यायालय, अकोला यांनी माझे, माझी पत्नी आणि जिल्हाधिकारी यांचे विरुध्द त्या दाव्यात मनाईहुकूम दिलेला आहे.

६. मी नारायणपुरा, बाळापूर येथे राहतो.
प्रश्न - तुम्हाला नारायणपुरा येथे घरी जातांना बाळापूर पोलीस स्टेशन जवळुन जावे लागते ?
उत्तर - घटना घडली त्यावेळी मी अकोला येथे राहत होतो.

रिपोर्ट देतांना माझा नारायणपुरा, बाळापूर येथील पत्ता दिला. नारायणपुरा येथे घरी जातांना बाळापूर पोलीस स्टेशन जवळुन जावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, दि. १५.०६.२०१६ रोजी शाळेमध्ये इलेक्ट्रीकचे फिटींगचे काम सुरु होते म्हणुन मी त्या ठिकाणी काम पाहण्यासाठी गेलो होतो, इलेक्ट्रीकचे फिटींगचे काम फिरोजखान नावाचा व्यक्ती करित होता, सकाळी ०९.३० वाजताच्या दरम्यान चारही आरोपी ट्रॅक्टर घेवुन शाळेच्या आवारात आले आणि त्यांनी ट्रॅक्टरने शाळेच्या शेतीवर नांगरणी सुरु केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना नांगरणी करण्यास मनाई केली असता त्यांनी मला लाथाबुक्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली आणि धमकी दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घडलेल्या घटनेबद्दल मी घरी जावुन माझ्या पत्नीला सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी

सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वेणुताई पाचपोर यांची शेत सर्व्हे नं. २ मधील ४० आर आणि शेत सर्व्हे नं. १० मधील २० आर ई–क्लास जमीनवर कब्जा करण्याच्या उद्देशाने आरोपींवर दबाव आणणेकरिता मी त्यांचे विरुध्द खोटा रिपोर्ट दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटी साक्ष दिली.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2024.11.25 11:03:12 +0530

बाळापूर.
दि. २३/११/२०२४

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.